दि. १५/१०/२०२०

# थोरात महाविदयालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला ,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेर येथे दि. १५/१०/२०२० रोजी दुपारी ठीक १.०० वाजता भारतरत्न डॉ . ए. पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कोविड-19 च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे यावर्षी वाचन प्रेरणा दिन ऑनलाईन पद्धतीचा वापर करून साजरा करण्यात आला . कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . दिनानाथ पाटील , उपप्राचार्य प्रा. शिवाजीराव नवले , उपप्राचार्य प्रा. गोरक्षनाथ थोरात उपस्थित होते .प्रा. सविता तांबे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ दिनानाथ पाटील यांनी डॉ कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन केले .

मा. प्राचार्य यांनी कार्यक्रमप्रसंगी ऑनलाईन सुविधेचा वापर करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा.राजेंद्र जोरवर,प्रा.सविता तांबे ,प्रा. सातपुते व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीचा वापर करून वाचनात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयांवर पुस्तकांचे वाचन केले . सुत्रसंचलन-प्रा. सविता तांबे यांनी केले.

प्रा. राजेंद्र जोरवर यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवन विषयक माहिती मुलांना दिली. मुलांनी वाचनाकडे लक्ष दिले पाहिजे व आपली बौद्धिक प्रगती साधली पाहिजे असेही ते म्हणाले . महाविद्यालयाचे प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने कार्यक्रमात सहभागी होते. प्रा. सातपुते यांनी सहभागी सर्वांचे आभार मानले.